# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


===========================================================================

जावक क्रमांक – ३३७६/४९ दिनांक :- ९ सप्टेंबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

**म्हाडा लोकशाही दिनानिमित्त सर्वसामान्यांना मिळतेय तक्रार निवारणाचे हक्काचे व्यासपीठ**

'म्हाडा'मध्ये आयोजित सहाव्या लोकशाही दिनात नऊ अर्जांवर सुनावणी

मुंबई, दि. ९ सप्टेंबर २०२४:- म्हाडाच्या लोकशाही दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांना तक्रार निवारणाचे हक्काचे व्यासपीठ मिळत आहे याची प्रचिती आज पुन्हा आली. अर्जदार श्री. मिलिंद रेले यांचा सुमारे ३५ वर्षांपासून रखडलेला सदनिका नियमितीकरणाचा प्रश्न मार्गी लावत 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी लोकशाही दिनामध्ये रेले कुटुंबीयांना न्याय मिळवून दिला आहे.

आज म्हाडा मुख्यालयात झालेल्या लोकशाही दिनात श्री. मिलिंद रेले यांनी केलेल्या अर्ज प्रकरणी सुनावणीवेळी मुंबईतील डी. एन. नगर, अंधेरीतील एका गृहनिर्माण संस्थेतील सदस्य दिवंगत श्री. बी. एस. रेले यांच्या नावे असलेली सदनिका त्यांच्या वारसांच्या नावे नियमितीकरण करण्याचे निर्देश श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले. या निर्णयामुळे सुमारे ३५ वर्षांपासून प्रलंबित प्रकरण मार्गी लावण्यात आले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या सहाव्या लोकशाही दिनात नऊ अर्जप्रकरणी सुनावणी झाली.

तसेच मुंबईतील प्रभादेवी येथील पवनछाया सहकारी गृहनिर्माण संस्थेतील श्रीमती भारती वंगारी यांच्या सदनिकेच्या नियमितीकरणाचा सन २००९ पासून प्रलंबित प्रश्न सोडवत श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले व या सदनिकेतील अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्याना सूचना द्याव्यात, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी आज दिले.

अंधेरी पश्चिम येथील श्रीमती वंदना शर्मा यांच्या अर्जाप्रकरणी पुनर्विकसित इमारतीत विकासकाने दोन सदनिका देण्याचा करारनामा केला असतांना संबंधित विकासकाने एकच सदनिका दिली. संबंधित अर्जदार श्रीमती शर्मा यांना दुसरी सदनिका मिळण्यासाठी इमारतीच्या नकाश्यात बदल करून इमारतीत असलेल्या फिटनेस सेंटरची जागा कमी करून उपलब्ध जागी सदनिका देण्यात यावी व त्याबदल्यात अर्जदार यांच्याकडून चटई क्षेत्राचे शुल्क घ्यावे, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

श्री. गोपाल धुरी यांच्या अर्जप्रकरणी सुनावणीवेळी श्री. धुरी यांच्या सदनिकेचे सन २००० मध्ये सर्वेक्षण झाले असून त्यांच्या पात्रतेबाबत निर्णय कागदपत्रे तपासून तात्काळ घेण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आज झालेल्या लोकशाही दिनात आलेल्या नऊ अर्जापैकी चार अर्ज मुंबई मंडळाशी संबंधित होते तर पाच अर्ज मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाशी संबंधित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण










-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

Outward No. 3336/49 Dt. 9th September, 2024

Press Release

## MHADA Provides Platform for Complaint Resolution on Lokshahi DIn

Hearing conducted on nine applications during the sixth Lokshahi DIn organized at MHADA

Mumbai, 9th September, 2024: Once again, it was evident that the common citizens are getting a rightful platform for grievance resolution on MHADA's Lokshahi DIn. The issue of regularizing a flat, pending for approximately 35 years, concerning applicant Mr. Milind Rele, was resolved today. On the occasion of Lokshahi DIn, MHADA Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal ensured justice for the Rele family.

During the Lokshahi din hearing held today at the MHADA headquarters on the application submitted by Mr. Milind Rele, Mr. Sanjeev Jaiswal directed that the flat in the name of the late Mr. B. S. Rele, a member of a housing society in D.N. Nagar, Andheri, be regularized in the name of his legal heirs. This decision resolved a case pending for almost 35 years.

Additionally, Mr. Jaiswal resolved the long-pending issue of regularizing the tenement of Mrs. Bharti Wangari, a member of the Pawan Chhaya Cooperative Housing Society in Prabhadevi, which had been pending since 2009. He directed the concerned officers to take immediate action and instructed them to notify the unauthorized occupants .

While In the case of Mrs. Vandana Sharma from Andheri West, the developer was suppose to provide two flats to a tenant in the redeveloped building, but the developer has given only one flat to the beneficiary. Mr. Jaiswal opined that the

house is more important than the other facilities in the society. Since the developer has failed to provide flat to the tenants he said and instructed that changes be made to the building's map to allocate the second flat to Mrs. Sharma by reducing the space of the fitness center, and the necessary carpet area fees should be charged accordingly from the beneficiary.

During the hearing of Mr. Gopal Dhuri's application, Mr. Jaiswal directed the authorities to immediately review the documents regarding the eligibility of Mr. Dhuri's flat, which had been surveyed in 2000, and to make a decision accordingly.

Of the nine applications heard on Lokshahi DIn, four were related to the Mumbai Board, while five were related to the Mumbai Repair and Reconstruction Board.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial